## शक्ती आराधनेचे पर्व- नवरात्र

ND

ND

आदिशक्तिच्या आराधनेचे पर्व म्हणून नवरात्रौत्सव साजरा केला जातो. शक्ती विना शिव हे शवासमान आहे, असे म्हटले जाते. शक्तीमुळेच तर संपूर्ण ब्रह्मांडाची उत्पती झाली आहे. शक्ती आराधना करण्यासाठी नऊ दिवसांचा काळ अर्थात नवरात्र अत्यंत महत्वपूर्ण आहे. नवरात्रात ब्रह्मांडातील सर्व शक्ती जागृत होतात. याच शक्तीने दैत्यांचा संहार केला आहे.

नवरात्रौत्सवासंदर्भात भारतातील प्रत्येक राज्यात विविधता दिसून येते. नवरात्रात आदिशक्तिच्या नऊ अवतारांची तिथीनुसार पूजा अर्चा केली जाते. शैलपुत्री, ब्रह्मचारिणी, चंद्रघंटा, कुष्मांडा, स्कंदमाता, कात्यायनी, कालरात्रि, महागौरी व सिद्धिदात्री, अशी देवीची नऊ रूपे आहेत.

गुजरातमध्ये नवरात्रौत्सवात गरबा, दांडियाने नवचैतन्य पसरते. बंगालमध्ये षष्ठीपासून दशमीपर्यंत देवीची पूजा केली जाते. महाराष्ट्रात नवरात्रीत घटस्थापना करून आदिशक्तीचे विधीवत पूजन केले जाते. मध्यप्रदेश व राजस्थान नवरात्रौत्सवादरम्यान उपवास केले जातात. या काळात शक्तिपीठांच्या दर्शनास विशेष महत्व असते. पंजाबमध्ये नऊ दिवसांचे उपवास करून जगराता माताराणीची आराधना केली जात असते.

नवरात्रौत्सवात लहान मुलींना देवी स्वरूप मानले जात असते. कन्या भोजन देऊन त्यांना दक्षिणा दिली जाते. कन्या भोजनाची परंपरा जवळजवळ सर्व राज्यात सारखीच आहे. समाजातील मुली, स्त्रियांना सन्मानाने वागविले पाहिजे, असा नवरात्रौत्सवातून संदेश दिला जात असतो.

### महागौरी



**श्वेते वृषे समारूढा श्वेताम्बरधरा शुचिः।**
**महगौरी शुभं दान्महादेवप्रमोददा।।**

दुर्गा मातेचे आठवे रूप म्हणजे महागौरी होय. दुर्गापूजेच्या आठव्या दिवशी महागौरीची पूजा केली जाते. महागौरीची पूजा केल्याने सर्व पापे धुऊन जातात. भविष्यात पाप-संताप, दुःख त्याच्याजवळ कधीही येत नाही. तो सर्व प्रकारच्या पवित्र आणि अक्षय पुण्याचा अधिकारी होतो. या देवीचा रंग पूर्णतः गोरा आहे. या गोऱ्यापराची उपमा शंख, चंद्र आणि कुंदाच्या फुलापासून दिली आहे. या देवीचे वय आठ वर्ष

मानले जाते, 'अष्टवर्षा भवेद् गौरी।' तीचे वस्त्र आणि आभूषणदेखील श्वेत रंगाची आहेत.

महागौरीला चार भुजा आहेत. वृषभ तिचे वाहन आहे. तिच्या वरील उजव्या हातात अभयमुद्रा आणि खालील उजव्या हातात त्रिशूळ आहे. वरच्या डाव्या हातात डमरू आणि खालील डाव्या हातात वर-मुद्रा आहे. महागौरी अत्यंत शांत स्वभावाची आहे.

आपल्या पार्वती रूपात तिने भगवान शंकराला पती रूपात प्राप्त करण्यासाठी कठोर तपस्या केली होती. गोस्वामी तुळशीदास यांच्या अनुसार तिने भगवान शंकराला पती करण्यासाठी कठोर संकल्प केला होता-
जन्म कोटि लगि रगर हमारी।
बरउँ संभु न त रहउँ कुँआरी।।

या कठोर तपस्येमुळे तिचे शरीर काळे पडले होते. तिच्या कठोर तपस्येवर प्रसन्न होऊन भगवान शंकराने तिला गंगेच्या पवित्र पाण्याने आंघोळ घातल्यावर ती अत्यंत गोरी दिसू लागली. तेव्हापासून तिला महागौरी या नावाने संबोधले जाते. देवी महागौरीचे स्मरण, पूजा भक्तांसाठी सर्वाधिक कल्याणकारी आहे. आपण नेहमी तिचे ध्यान केले पाहिजे. तिच्या कृपेमुळे अलौकीक सिद्धी प्राप्त होते. महागौरी भक्ताचे संकट अवश्य दूर करते. तिच्या उपासनेमुळे अशक्य कार्य शक्य होते. तिला शरण जाण्यासाठी आपण अधिक प्रयत्न केला पाहिजे. देवी महागौरीचा महिमा पुराणात वर्णिला आहे.

## सिद्धीदात्री

सिद्धगन्धर्वयक्षारसुरैरमरैरपि।
सेव्यमाना सदा भूयात् सिद्धीदा सिद्धीदायिनी।।

ND

दुर्गा मातेची नववी शक्ती म्हणजे सिद्धीदात्री होय. ही सर्व प्रकारची सिद्धी देणारी देवी आहे. दुर्गा पूजेच्या नवव्या दिवशी या देवीची पूजा केली जाते. या दिवशी शास्त्रोक्त विधी पूर्ण निष्ठेने करणाऱ्या साधकांना सर्व प्रकारची सिद्धी प्राप्त होते. ब्रह्मांडावर पूर्ण विजय मिळविण्याचे सामर्थ्य त्यांच्यात येते.

अणिमा, महिमा, गरीमा, लघिमा, प्राप्ती, प्राकाम्य, ईशित्व आणि वशित्व या आठ सिद्धी मार्कण्डेय पुराणात सांगितल्या आहेत. देवी सिद्धीदात्रीत या सर्व सिद्धी आपल्या भक्ताला प्रदान करण्याची क्षमता आहे. भगवान शंकराने देवीच्या कृपेनेच या सर्व सिद्धी प्राप्त केल्या होत्या. यामुळेच शिवाचे अर्धे शरीर देवीसारखे झाले होते. या कारणामुळे त्यांना लोक 'अर्धनारीनटेश्वर' या नावाने ओळखतात.

देवी सिद्धीदात्री चार भुजाधारी आहे. तिचे वाहन सिंह आहे. ती कमळाच्या फूलावरही विराजमान होऊ शकते. तिच्या उजव्या बाजूकडील खालच्या हातात कमळाचे फूल आहे.

देवी सिद्धीदात्रीची कृपा प्राप्त करण्यासाठी प्रत्येक मनुष्याने निरंतर प्रयत्न केले पाहिजेत. तिच्या कृपेने अनेक दुःख दूर करून तो सुखाचा उपभोग घेऊ शकतो. त्यामधून त्याला मोक्षाचा मार्गही मिळतो. नवदुर्गामध्ये देवी सिद्धीदात्री शेवटची देवी आहे. या देवीची उपासना पूर्ण केल्यानंतर साधकाच्या सर्व मनोकामना पूर्ण होतात.